महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४६ /२०२४ दि. १५/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, मुंब्रा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **'रमजान ईद'** सणानिमित्त दि. १५/०३/२०२४ ते दि. ११/०४/२०२४ रोजीपावेतो शहरातील तसेच बाहेरील नागरिक खरेदीकरीता शहरामध्ये येतात. सदर कालावधीत मुंब्रा स्टेशन ते वाय जंक्शन शिळफाटा कडे जाणारी वाहने, बसेस, अत्यावश्यक वाहने, प्रवासी वाहतूक मोठया प्रमाणात होत असते. तसेच वाहतुकीचा ओघ देखील जास्त असल्याने सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद वेळ –** १) मुंब्रा रेल्वे स्टेशन कडून वाय जंक्शन मार्गे शिळफाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मित्तल ग्राउंड** येथे दुपारी १६:०० ते रात्रौ ०२:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मित्तल ग्राउंड कडून डावे वळण घेवून एम. एम. व्हॅली मार्गे शिमला पार्क येथे मुख्य रस्त्याने डावे वळण घेवून वाय जंक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ठाणे, कळवा कडून रेतीबंदर मार्गे शिळफाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रेतीबंदर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मुंब्रा शहरात न येता रेतीबंदर येथून मुंब्रा बायपास मार्गे वाय जंक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद वेळ –** ३) मुंब्रा शहरातील मार्केट करीता साहित्य घेवून येणारे जड वाहनांना सकाळी १०:०० ते दुपारी ०३:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**प्रवेश मर्यादा –** सदर वाहनांना (मार्केट साहित्य, दूध) मुंब्रा शहरात येण्यास पहाटे ०३:०० ते १०:०० दरम्यान **'प्रवेशास मुभा'** देण्यात येत आहे.

**प्रवेश बंद वेळ –** ४) ठाणे ते भारत गियर कंपनी दरम्यानचे शासकीय/प्रवासी बसेसना अग्निशामक कार्यालयापुढे सायंकाळी १७:०० ते रात्रौ ०२:०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर वाहने मुंब्रा रेतीबंदर कडून मुंब्रा शहरात न येता मुंब्रा बायपास मार्गे इच्छीत स्थळी जातील.
ब) वाय जंक्शन कडून मुंब्रा शहरात आलेल्या शासकीय/प्रवासी बसेस परत वाय जंक्शन कडे न जाता मुंब्रा रेतीबंदर, मुंब्रा बायपास मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसूचना **'रमजान ईद'** सणानिमित्त दि. १५/०३/२०२४ ते दि. ११/०४/२०२४ रोजीपावेतो अंमलात राहील.

सदर अधिसूचनेचा भंग करणाऱ्या वाहनचालकाविरूध्द मोटार वाहन कायदा १९८८ कलम १७९ (१) अन्वये कारवाई करण्यात येईल.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१, ५, वि.शा. ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

<u>प्रत</u> :— <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :— <u>संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व पो.निरी. वाहतूक उपविभाग</u> ठाणे.

CamScanner